**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत वांद्रे-कुर्ला संकुलातील २०० हेक्टर जमिनीवर G, G-N, G-Txt & E ब्लॉक येथे विकसित करीत असलेल्या प्रकल्पाला आंतरराष्ट्रीय वित्तीय आणि व्यापार केंद्र / वित्तीय व्यापार क्षेत्र असे शासनाच्या औद्योगिक धोरणानुसारची मान्यता कायम करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन आदेश क्रमांक : एमआरडी-३३२२/प्र.क्र.१६०/नवि-७,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- २९ जुलै, २०२२**

**<u>शासन आदेश</u>**

**ज्याअर्थी,** मुंबई महानगर प्रदेश (MMR) ची पहिली प्रादेशिक योजना शासनाद्वारे १९७० मध्ये महाराष्ट्र प्रदेशिक व नगर रचना अधिनियम (MR&TP Act), १९६६ च्या तरतुदींनुसार मंजूर करण्यात आली होती, त्यामध्ये वांद्रे-कुर्ला भागात पर्यायी वित्तीय केंद्र स्थापन करण्याची शिफारस केली होती.

**आणि ज्याअर्थी,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (MMRDA) स्थापना करण्यात आली आहे. या कायद्याच्या कलम ३(३) नुसार, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे स्थानिक प्राधिकरण म्हणून समजण्यात यावे अशी तरतूद आहे.

**आणि ज्याअर्थी,** शासन अधिसूचना दि. ७.०३.१९७७ अन्वये प्राधिकरणाला MR&TP कायदा, १९६६ च्या कलम ४० अंतर्गत वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स अधिसूचित क्षेत्र (BKC) साठी विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

**आणि ज्याअर्थी,** दिनांक ३०.११.१९७७ रोजीच्या प्राधिकरणाच्या १३ व्या बैठकीतील ठराव क्र.१३८ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ मधील कलम ५० व ३ (२) अनुसार प्राधिकरणाचे जमीन विल्हेवाट विनियम, १९७७ मंजूरी करण्यात आले आहेत. या विनियमानुसार प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनीचे वाटप ८० वर्षासाठी भाडेपट्ट्याने करण्यात येते.

**आणि ज्याअर्थी,** MR&TP कायदा, १९६६ अंतर्गत शासन अधिसूचना दि. ९.०४.१९७९ नुसार MMRDA द्वारे सादर केलेल्या नियोजन प्रस्तावांना व वांद्रे-कुर्ला संकुल विकास नियंत्रण नियमावली (DCR) यांना शासनाने मान्यता दिली आहे. या मंजूर नियोजन प्रस्तावानुसार बीकेसी मधील A, B, C&D, E, F, G, H & I असे ब्लॉक असून यापैकी फक्त E & G ब्लॉकमधील जमीन एमएमआरडीएच्या मालकीची आहे. सद्यस्थितीत, G ब्लॉक हा G, GN आणि G-Txt ब्लॉकमध्ये विभागला गेला आहे.

**आणि ज्याअर्थी,** १९९० च्या दशकात भारत सरकारने भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वित्त बळकट करण्यासाठी आणि चालना देण्यासाठी, परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आणि जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये भारताची उपस्थिती वाढवण्यासाठी अनेक धोरणात्मक उपाययोजना सुरू केल्या. यासाठी भारत सरकारने जुलै, १९९१ मध्ये आर्थिक, व्यापार, वित्तीय आणि औद्योगिक उदारीकरण धोरण घोषित केले असून ते भारतीय अर्थव्यवस्थेचे उदारीकरण, जागतिकीकरण, विकेंद्रीकरण यासंबंधी आहे.

**आणि ज्याअर्थी,** प्राधिकरणाच्या २१.१२.१९९२ रोजीच्या १४८ व्या कार्यकारी समितीच्या बैठकीत वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये आंतरराष्ट्रीय वित्त आणि व्यापार केंद्र (IFBC) च्या विकासासाठी E & G Blocks मध्ये IFBC विकसीत करण्यास मान्यता दिली आहे.

**आणि ज्याअर्थी,** दिनांक १३.०४.१९९३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्य औद्योगिक धोरण-१९९३ तयार करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. मा. मंत्रिमंडळाने भारत सरकारच्या १९९१ च्या औद्योगिक धोरणावर आधारित राज्य औद्योगिक धोरण-१९९३ विधिमंडळाच्या सभागृहात मांडण्याबाबत निर्देश देण्यात आले. मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्याच्या औद्योगिक धोरणात काही सुधारणाही करण्यात आल्या. या मंत्रिमंडळ बैठकीत केलेल्या महत्त्वाच्या बदलांपैकी एक म्हणजे MMRDA द्वारे आंतरराष्ट्रीय वित्त आणि व्यापार केंद्राच्या विकासासाठी वांद्रे-कुर्ला संकुलातील १०० हेक्टर ऐवजी २०० हेक्टर जागा आरक्षित करणे. १३.०४.१९९३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या कार्यवृत्तावर १५.०४.१९९३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या त्यानंतरच्या बैठकीत पुष्टी करण्यात आली होती. अशा प्रकारे, १३.०४.१९९३ पासून, राज्य औद्योगिक धोरण-१९९३ लागू करण्यात आले आणि MMRDA ला वांद्रे कुर्ला संकुलामध्ये २०० हेक्टरवर आंतरराष्ट्रीय वित्त आणि व्यापार केंद्राच्या विकासासाठी निर्देश देण्यात आले. मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे, राज्याचे औद्योगिक धोरण २२.०४.१९९३ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांत सादर करण्यात आले होते. सदर राज्य औद्योगिक धोरणावर दोन्ही सभागृहात चर्चा, विचारविनिमय करून मंजूरी देण्यात आली त्यामध्ये MMRDA द्वारे वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्समधील २०० हेक्टर जमिनीवर आंतरराष्ट्रीय वित्तीय आणि व्यापार केंद्र स्थापन करण्याबाबत समावेश आहे.

**आणि ज्याअर्थी,** प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०२.१२.१९९३ रोजी झालेल्या १५४व्या बैठकीत वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये आंतरराष्ट्रीय वित्त आणि व्यापार केंद्रासाठी नियोजन आणि विपणन धोरण तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. दिनांक २४.०५.१९९४ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या १५६व्या बैठकीत वांद्रे-कुर्ला संकुलाच्या G ब्लॉकमध्ये आंतरराष्ट्रीय वित्त आणि व्यापार केंद्रासाठी योजना तयार करण्यासाठी अर्बन डिझाइन सल्लागार नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. बीकेसीचा E ब्लॉक यापूर्वीच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, आयकर विभाग, विक्रीकर इत्यादी प्रमुख वित्तीय संस्थांसह विकसित केला गेला आहे. बीकेसीच्या E आणि G ब्लॉक चे सुमारे २०० हेक्टर क्षेत्र प्राधिकरणाच्या मालकीचे असून सदरचे क्षेत्र वांद्रे-कुर्ला संकुलाचे आंतरराष्ट्रीय वित्त आणि व्यापार केंद्र म्हणून विकसीत करण्यात येत आहे.

**आणि ज्याअर्थी,** प्राधिकरणाने २३.०१.१९९८ रोजी झालेल्या ९१व्या प्राधिकरण बैठकीत वांद्रे-कुर्ला संकुलामधील IFBC मधील जमीन विल्हेवाट धोरण-१९७७ नुसार IFBC मधील जमिनीच्या वाटपासाठी (अ) आर्थिक संस्था, (b) अग्रगण्य भारतीय आणि परदेशी कंपन्या, (c) माहिती, डेटा प्रक्रिया, संगणक आणि दूरसंचार संस्था, (d) व्यापार आणि व्यवसाय संस्था, (e) नियामक प्राधिकरणे, (f) व्यवसाय समर्थन सेवा अशा ६ श्रेणी मंजूर केल्या आहेत. दिनांक १४.१२.२००३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या २००व्या कार्यकारी समितीच्या बैठकीत व्यावसायिक विकासकांना (प्रोफेशनल डेव्हलपर्स) वांद्रे-कुर्ला संकुलामधील भूखंड वाटपासाठी पात्र ठरवण्यासाठी मंजूरी देण्यात आली. प्राधिकरणाने २६.०८.२०१५ रोजी झालेल्या १३८व्या बैठकीत BKC च्या IFBC मधील जमिनी विल्हेवाट धोरणाचे पुनरावलोकन केले आणि भाडेपट्टा शुल्क (लीज प्रीमियम) हप्त्यांमध्ये भरण्याची परवानगी दिली.

**आणि ज्याअर्थी,** बीकेसीचा आंतरराष्ट्रीय वित्त आणि व्यापार केंद्र म्हणून विकास करण्याबाबत राज्य सरकारच्या आदेश आणि धोरणांच्या अनुषंगाने, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, कोटक महिंद्रा बँक, कॅनरा बँक, देना बँक, पंजाब नॅशनल बँक, इन्कम टॅक्स, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, नाबार्ड, नॅशनल स्टॉक एक्सचेंज (NSE) यासारख्या भारतातील प्रतिष्ठित वित्तीय संस्था व इतर आंतरराष्ट्रीय आस्थापना तसेच जागतिक वित्तीय संस्थाची कार्यालय, वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये स्थापन केली आहेत. सद्यपरिस्थितीत वांद्रे-कुर्ला संकुल हे भारतातील प्रमुख आंतरराष्ट्रीय वित्त आणि व्यापार केंद्र म्हणून विकसित झाले आहे.

**आणि ज्याअर्थी,** वांद्रे कुर्ला संकुलाचा IFBC म्हणून होत असलेला विकास आणि या क्षेत्रात एमएमआरडीएद्वारे प्रदान केलेल्या पायाभूत सुविधा विचारात घेऊन, नगर विकास विभाग, शासन अधिसूचना दिनांक ०२.०५.२००८, दिनांक २१.०८.२००८ व दिनांक ३१.०८.२००९ अन्वये वांद्रे-कुर्ला संकुलातील अनुक्रमे G, D व E ब्लॉकमधील जमिनीचा चटई निर्देशांक (FSI) वाढविण्यात आला आहे.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्य औद्योगिक धोरण-१९९३ आणि शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार सन १९९३ पासून वांद्रा-कुर्ला संकुलामध्ये आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्र (IFBC) विकसित करण्याच्या दृष्टीने प्राधिकरण व त्याच्या कार्यकारी समितीने वेळोवेळी घेतले निर्णय विचारात घेऊन वांद्रे कुर्ला संकुलातील २०० हेक्टर जमिनीवर आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्र स्थापित करण्याची कार्यवाही सन १९९३ पासून सुरु आहे.

**त्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत, वांद्रे-कुर्ला संकुलातील G, G-N, G-Txt & E Blocks वरील सुमारे २०० हेक्टर जागेवर विकसित करण्यात येत असणारे आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्र (International Finance & Business Centre )/ वित्तीय व्यापार क्षेत्र (Financial Business Area) ला, दिनांक २२.०४.१९९३ रोजी शासनाने जाहीर केलेल्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक धोरण-१९९३ ला शासनाने दिलेली मान्यता या आदेशाद्वारे कायम करण्यात येत आहे.(सोबत जागेचा नकाशा जोडला आहे.)**

**०२.** सदर शासन आदेशानुसार संबंधित विभागांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

**०३.** सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२२०७२९११००५८३३२५ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay Karbhari Chaudhari

Digitally signed by Vijay Karbhari Chaudhari
DN: CN = Vijay Karbhari Chaudhari, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = URBAN DEVELOPMENT DEPARTMENT
Date: 2022.07.29 13:46:33 +05'30'

**( विजय चौधरी )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. मा. सचिव, शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार, निर्माण भवन, नवी दिल्ली
६. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. प्रधान सचिव (उद्योग) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१२. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१३. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
१४. जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर
१५. सह सचिव, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१६. निवड नस्ती (नवि-७).

(शासन आदेश क्र. एमआरडी-३३२२/प्र.क्र.१६०/नवि-७ दि. २९/०७ /२०२२ चे सहपत्र)

महाराष्ट्र राज्याच्या दि. २२ एप्रिल,१९९३ रोजीच्या औद्योगिक धोरणाप्रमाणे वांद्रे-कुर्ला संकुल येथील G,GN,G-Txt व E ब्लॉकमधील सुमारे २०० हे. जमिनीवरील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्र(IFBC)/ वित्तीय व्यापार क्षेत्र (FBA) चा नकाशा




Vijay Karbhari Chaudhari

Digitally signed by Vijay Karbhari Chaudhari
DN: CN = Vijay Karbhari Chaudhari, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = URBAN DEVELOPMENT DEPARTMENT
Date: 2022.07.29 13:47:17 +05'30'

**Regarding the confirmation of project being developed by MMRDA on 200 Ha. of land at G, G-N, G-Txt and E-block of BKC as International Finance & Business Center (IFBC)/ Financial Business Area (FBA), as per State Industrial Policy.**

**Government of Maharashtra**
Urban Development Department
Mantralaya, Mumbai 400 032
No.: MRD-3322/CR160/UD-7,
Dated: 29.07.2022

**GOVERNMENT ORDER**

**Whereas**, the first Regional Plan of Mumbai Metropolitan Region (MMR) was approved by Government of Maharashtra (GoM) under the provisions of Maharashtra Region & Town Planning Act (MR&TP Act),1966 in 1970, which recommended the establishment of alternate financial center in Bandra-Kurla Area;

**And whereas**, Govt. of Maharashtra established Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) under Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974 (MMRDA Act,1974). As per Section 3(3) of the MMRDA Act,1974, the Metropolitan Authority shall deem to be a Local Authority;

**And whereas**, Govt. of Maharashtra under Section 40 of the MR&TP Act,1966, vide its Notification No. BKR1177/262-UD-5 dt. 7.03.1977 appointed MMRDA as Special Planning Authority (SPA) for Bandra-Kurla Complex Notified Area (BKC);

**And whereas**, as per section 50 and 3(2) of MMRDA Act, 1974 MMRDA is authorized to issue regulation for disposal of land allotted to MMRDA for development. Exercising this power, Authority in its 13$^{th}$ meeting held on 30.11.1977 passed Resolution 138 and approved MMRDA Land Disposal Regulations, for disposal of lands allotted to MMRDA by GoM on lease of 80 years period;

**And whereas,** Govt. of Maharashtra under MR&TP Act,1966, vide its Notification No. BKR1177/262-UD-5 dt. 9.04.1979 approved the Planning Proposals submitted by MMRDA for the development of Land in Bandra Kurla Complex with Development Control Regulations (DCRs). As per these sanctioned Planning Proposals A, B, C&D, E, F, G, H & I blocks are formed in BKC, out of which Land from E & G Block of BKC is owned by MMRDA. as on date, the G Block is sub-divided in to G, G-N & G-Txt Block;

**And whereas**, in 1990s the Government of India introduced a series of policy measures to strengthen and boost India's international

trade and finance to attract foreign investment and increase India's presence in the world economy. In this regard, Government of India declared Economic, Trade, Financial & Industrial Liberalization Policy in July, 1991. This Government of India's (GoI) Industrial Policy of 1991 is regarding liberalization of Indian Economy, globalization, decentralization and beginning of delicense era;

**And whereas**, MMRDA in its 148th Executive Committee Meeting held on 21.12.1992, approved the proposed IFBC in E & G Block of BKC;

**And whereas**, Cabinet meeting held on 13.04.1993 decided to formulate State Industrial Policy 1993 based on Industrial Policy of Government of India 1991, which was tabled in Legislative Assembly and certain amendment regarding development of International Finance & Business Center in BKC by MMRDA on 200 Ha. of land were approved. The Minutes of this Cabinet meeting of 13.04.1993 were confirmed in next cabinet meeting held on 15.04.1993. In the State Industrial Policy 1993 it was decided to develop International Finance & Business Center on 200 Ha. of land in BKC by MMRDA. As decided in the cabinet, the State Industrial Policy was tabled in both Legislative Assembly and Legislative Council on 22.04.1993, wherein it was discussed and deliberately approved, clearly mentioning the establishment of International Finance & Business Center (IFBC) in BKC on 200 Ha. of land by MMRDA;

**And whereas**, the Executive Committee of MMRDA in its 154th Meeting held on 2.12.1993 decided to formulate a Planning & Marketing Strategy for International Finance & Business Centre in BKC. In the 156th Executive Committee meeting held on 24.05.1994 it was decided to appoint an Urban Design Consultant for preparation of Plan for this International Finance and Business Centre in 'G' Block of BKC. Whereas the 'E' Block of BKC was already developed with major financial institutions such as Reserve Bank of India, Income tax Department, Sales Tax, etc. 'E' and 'G' Block of BKC admeasuring around 200 Ha is owned by MMRDA and developed as International Finance & Business Centre in BKC;

**And whereas**, Authority in its 91st Authority Meeting held on 23.01.1998 reviewed policy on disposal of land in IFBC in BKC and approved 6 Categories for allotment of land in IFBC which are: (a) Financial Institutions, (b) Leading Indian & Foreign Companies, (c) Information, Data Processing, Computers & Telecommunications, (d) Trade & Business, (e) Regulatory Authorities, (f) Business Support Services. In the 200th Executive Committee Meeting held on 14.12.2003, a review of the Land Disposal Policy for IFBC was taken and approval was accorded to make eligible the Professional Developers for allotment plots in BKC. Authority in its 138th Meeting held on 26.08.2015, reviewed policy on disposal of land in IFBC in BKC & allowed the Lease Premium to be paid in installments;

**And whereas**, in pursuance to said orders and policies of the State Government on the development of BKC as International Finance and

Business Centre, most of the prestigious financial institutions from India such as State Bank of India, Bank of India, Bank of Baroda, Kotak Mahindra Bank, Canara Bank, Dena Bank, Punjab National Bank, Income Tax, Reserve Bank of India, NABARD, National Stock Exchange (NSE) and global institutions and international institutions have established their Offices in BKC. BKC is the premier International Finance and Business Centre of India as of today;

**And whereas**, considering the development of International Finance & Business center and necessary infrastructure development in BKC by MMRDA, Urban Development Department vide its Notifications dt. 2.05.2008, dt. 21.08.2008 and 31.08.2009 decided to increase the Floor Space Index in Bandra Kurla Complex in G, D and E block respectively. As per State Industrial Policy 1993 and Governments directions therein, International Finance & Business Center (IFBC) is being developed in BKC on 200 Ha of land from the year 1993.

**And whereas**, as per the State Industrial Policy, 1993 and considering the decisions taken by MMRDA's Authority and its Executive Committee and as per the directions given by Government from time to time the International Finance & Business Center (IFBC) is developed in BKC since 1993 on 200 Ha land as Finance Business Area (FBA);

**Hence, by this Government Order it is confirmed that the project being developed by MMRDA on 200 Ha. of land at G, G-N, G-Txt and E block in Bandra Kurla Complex as International Finance and Business Centre (IFBC)/Finance Business Area (FBA) as per State Industrial Policy 1993 declared by Government on 22.04.1993. (The map indicating boundaries of the said land is enclosed herewith).**

**02. Concerned Departments to take necessary action as per this Government Order.**

**03. This Order is available on Government Website www.maharashtra.gov.in and its unique code is 202207291100583325. This Order is digitally signed.**

**By order and in the name of Hon. Governor of Maharashtra**

— sd —
**(Vijay Chaudhari)**
**Dy. Secretary,**
**Govt. of Maharashtra**

To,

1. Secretary to Hon. Governor, Maharashtra State.
2. Add. Chief Secretary to Hon. Chief Minister, Mantralaya, Mumbai 400 032.
3. Secretary to Hon. Dy. Chief Minister, Mantralaya, Mumbai 400 032.
4. Hon. Chief Secretary, Mantralaya, Mumbai 400 032.
5. Hon. Secretary, Urban development Ministry, Govt. of India, Nirman Bhavan, New Delhi.
6. Add. Chief Secretary (Revenue), Revenue & Forest Dept, Mantralaya, Mumbai 400 032.

7. Add. Chief Secretary (Finance), Finance Dept, Mantralaya, Mumbai 400 032.
8. Add. Chief Secretary (UD-1), Urban development Dept, Mantralaya, Mumbai 400 032.
9. Principal Secretary (UD-2), Urban development Dept, Mantralaya, Mumbai 400 032.
10. Principal Secretary, Planning Dept, Mantralaya, Mumbai 400 032.
11. Principal Secretary (Industries, Energy & Labour Department), Mantralaya, Mumbai - 400 032
12. Metropolitan Commissioner, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra (East), Mumbai.
13. Divisional Commissioner, Konkan Division, Navi Mumbai.
14. Collector, Mumbai City/ Mumbai Suburban District.
15. Joint Secretary, Town Planning, Urban Development Department, Mantralaya, Mumbai - 400 032.
16. Select File (UD-7).

(Annexure to Govt. Order No. MRD-3322/CR160/UD-7 dated 29/07/2022)

Map showing boundary of International Finance and Business Centre(IFBC)/ Finance Business Area (FBA) in Bandra-Kurla Complex as per Maharashtra State's Industrial Policy dated 22nd April, 1993.

